**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १२ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

**1. युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्यावरून विरोधकांची संसद भवन परिसरात निदर्शनं**

**2. नागपूरमध्ये काँग्रेसचे गॅस दरवाढी विरोधात आंदोलन**

**3. भारताचा ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजांना होर्मुझ ओलांडण्यासाठी इराणची परवानगी**

**4.उद्यापासून 16 मार्चपर्यंत विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमानाचा इशारा**

**आता सविस्तर बातम्या …….**

**लोकसभा**

अमेरिका-इस्रायल आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्यावरून आज विरोधकांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. लोकसभेत विरोधकांच्या निषेधाच्या घोषणांमुळे सभागृहाचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभा सभापती ओम बिरला यांच्या विरोधातला अविश्वास ठराव काल आवाजी मतदानाने फेटाळला गेला, त्यानंतर आज बिरला यांनी कामकाजाची सूत्रं हातात घेतली. अविश्वास प्रस्तावावर सभापती ओम बिर्ला यांनी आज निवेदन दिलं. सदनातल्या प्रत्येक सदस्याला नियमाप्रमाणेच बोलण्याची संधी मिळत असल्याचं बिर्ला यांनी सांगितलं. ते म्हणाले -

बिरला यांच्या निवेदनानंतर दुपारी २ वाजेपर्यंत लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत आज जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यावरच्या हल्ल्याची सखोल चौकशी केली जाईल, असं आश्वासन सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी दिलं. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला काल एका हल्लेखोराने केलेल्या गोळीबारातून सहीसलामत बचावले. अब्दुल्ला जम्मू इथं एका

विवाहसोहळ्याला गेले असताना ही घटना घडली. हल्लेखोराला पोलिसांनी पकडलं असून पुढचा तपास सुरु आहे.

**दरवाढ निषेध**

व्यावसायिक आणि घरगुती सिलेंडर वाढी विरोधात राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. वाढत्या महागाईच्या आणि घरगुती गॅस सिलिंडरच्या दरवाढीच्या निषेधार्थ नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज आंदोलन करण्यात आलं. केंद्र सरकारने गॅस सिलिंडरचे दर सुमारे ४०० रुपयांवरून ९०० रुपयांपर्यंत वाढवून सर्वसामान्यांवर आर्थिक अन्याय केल्याचा आरोप काँग्रेसने केला. तसेच गॅस सिलिंडरच्या प्रतीक्षा कालावधीत वाढ आणि व्यावसायिक सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याचा दावा आंदोलकाकांकडून करण्यात आला.

आंदोलनात काँग्रेसचे नगरसेवक, माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. दरम्यान आखाती देशांमधील युद्धामुळे गॅस सिलेंडर वितरणाचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे. अशा परिस्थितीत गॅस सिलेंडरचा काळा बाजार तसेच अनावश्यक साठा करणाऱ्यांवर कडक कारवाई करू असा इशारा यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ विकास मीना यांनी दिला आहे. काळाबाजार करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी 16 पथकांची निर्मीती करण्यात आली असून, काळाबाजार करताना कोणी आढळल्यास अत्यावश्यक वस्तू कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येईल असं जिल्हाधिकाऱ्यांनी बजावल आहे.

**विधिमंडळ**

हवामान बदल आणि त्याचा शेतीवर होणारा गंभीर परिणाम हे सरकारसमोरचं मोठं आव्हान असून त्या त्या वेळी सरकारनं योग्य ती पावलं उचलली आहेत, भविष्यात येणाऱ्या आव्हानांनाही तोंड द्यायला सरकार तयार आहे, मात्र समाजातल्या सर्व घटकांनी यासाठी हातभार लावायला हवा, असं आवाहन राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी आज विधानपरिषदेत केलं. अमोल मिटकरी यांनी याबद्दलची अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. विविध विकास प्रकल्पांसाठी पर्यावरणीय परवानग्या घेतल्या जातात, पण त्यातल्या अटींची पूर्तता होत नाही, त्यासाठी पर्यावरणीय मानकांची कडक अंमलबजावणी करणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

**विधान परिषदेच्या कामकाजाला आज सुरु झाल्यानंतर अर्धा तास चर्चेला उत्तर देण्यासाठी कोणत्याही संबंधित खात्यांचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याबद्दल**

**विक्रम काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांना सभागृहात येण्याचे निरोप गेले आहेत, असं सांगत ते येईपर्यंत पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केलं.११ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार मानधन तत्वावर असलेल्या सरळ सेवा पदभरतीची परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना कायम करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचं  मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत सांगितलं. राजू तोडसाम, सुधीर मुनगंटीवार, नितीन राऊत यांनी हा मुद्दा लक्ष्यवेधी द्वारे उपस्थित केला.बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराची पाणी पातळी वाढत असल्यामुळे पर्यटनावर विपरीत परिणाम होत असल्याचा मुद्दा सिद्धार्थ खरात यांनी लक्ष्यवेधी द्वारे उपस्थित केला होता. सरोवराच्या विकासासाठी गठीत करण्यात आलेल्या लोणार सरोवर आणि संवर्धन समितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, अभ्यासक आणि संशोधकांचा समावेश करण्याची मागणी खरात यांनी केली. ही मागणी वनमंत्री गणेश नाईक यांनी तालिका अध्यक्षांच्या निर्देशानंतर मान्य केली.मौलाना आझाद महामंडळासाठी ७०० कोटींपर्यंत निधीची तरतूद वाढवली आहे. यात मुदत कर्ज योजने अंतर्गत ११ हजार ४५४ लाभार्थ्यांना १५६ कोटींचं वाटप झालं असून ३३८ कोटी ८२ लाख रुपये शैक्षणिक कर्ज आतापर्यंत वाटप झाल्याचं मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. या शैक्षणिक वर्षात निधी उपलब्ध नसल्यामुळे कर्ज वाटप झालं नाही, केंद्र सरकारकडून १५ कोटी मिळाले असून ७३ कोटी बाकी आहेत. निधी मिळाला की लाभार्थ्यांना लवकरात लवकर वाटप केलं जाईल असं भरणे यांनी सांगितलं. नितीन राऊत, अस्लम शेख यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता.**

**आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी हेमांगी कुळकर्णी**

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आसामामधल्या गुवाहाटी इथून प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा २२ वा हप्ता जारी करतील. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज सकाळी नवी दिल्लीत ही घोषणा केली.

**जहाज परवानगी**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर आणि इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्यात झालेल्या चर्चेनंतर इराणने भारताचे ध्वज असलेल्या दोन तेलवाहू जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी दिली आहे. पुष्पक आणि परिमल ही दोन्ही जहाजं होर्मुझमधून प्रवास करून भारतात येतील. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे भारताची २८ जहाजं होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या परिसरात थांबून आहेत. या जहाजांवर सुविधा

पुरवणं आणि सुरक्षितता यांवर संबंधित अधिकारी लक्ष ठेवून आहेत.दरम्यान अमेरिका इस्राएल विरुद्ध इराण युद्धाचा आज १३ वा दिवस आहे. दोन्ही बाजूंनी हल्ले सुरुच असल्यानं पश्चिम आशिया क्षेत्रात अद्याप संहार थांबलेला नाही. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान यांनी युद्ध थांबवण्यासाठी तीन अटी जाहीर केल्या आहेत. अल ज़जीरा या दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितलं की, इराणच्या कायदेशीर हक्कांचं संरक्षण, युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई आणि भविष्यात हल्ला होणार नाही अशी आंतरराष्ट्रीय हमी मिळाली तर इराण तात्काळ युद्ध थांबवायला तयार आहे. मात्र ही तयारी म्हणजे इराणची कमजोरी असल्याचा समज करुन घेऊ नये, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. -

दरम्यान भारताची 70 टक्के आयात होर्मूझ व्यतिरिक्त इतर मार्गांनी येत आहे त्यामुळे कच्च्या तेलाच्या उपलब्धतेत भारत सुस्थितीत असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव, सुजाता शर्मा, यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं.

**यशवंतराव चव्हाण जयंती**

माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची ११३ वी जयंती आज साजरी होत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज कराड इथल्या प्रीतीसंगम या यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी अभिवादन केलं. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांवर काम करणार असल्याचं सुनेत्रा पवार यांनी यावेळी सांगितलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन केलं आहे.नागपूरच्या मनपा मध्ये देखील यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्यात आलं.

**हवामान**

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्म्या पासून विदर्भातील लोकांना दिलासा मिळू शकतो. उद्यापासून येत्या 16 मार्चपर्यंत विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान आणि पावसाचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. उद्या यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात तर परवा नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान आज, अकोला आणि चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. आज नागपुरात ३७ पूर्णांक ६ इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. काल विदर्भात अकोला इथं सर्वाधिक 41

अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची तर अमरावती इथं 40. 4, तर वर्धा इथं 39. 6 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

*****